aglasem.com

FOR MAHARASHTRA BOARD (MSBSHSE) CLASS 9 EXAM PREPARATION

Maharashtra Board (MSBSHSE) Class 9 2026 Question Paper · Marathi

EXAM
Maharashtra Board (MSBSHSE) Class 9

YEAR
2026

TYPE
Question Paper

SUBJECT
Marathi

पेपर नं. ३६

इयत्ता: तुकडी:

हजेरी क्र.:

दिनांक:

द्वितीय सत्र परीक्षा २०२५-२६

कृतिपत्रिका

मराठी

माध्यम- मराठी

वेळ : ३ तास

एकूण गुण : ८०

पृष्ठ संख्या : ७

कृतिपत्रिकेसाठी सूचना

१) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

३) उपयोजित लेखनातील कृतीसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही तसेच या कृती लिहून घेवू नयेत.

४) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमानूसार लेखन याकडे जाणीव पूर्वक लक्ष द्यावे.

विभाग १ : (गद्य)

प्र. १ अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.

कृती-१ आकलन कृती

१) कारणे लिहा. (२)

i) बाईंना प्रीतम लुथरा हे नाव वेगळे वाटले.

ii) प्रीतमला मराठी नीट येत नसे.

दुसरीच्या वर्गावरती मी नेहमीप्रमाणे हजेरी घेत होते. जोशी, कुलकर्णी, देशपांडे, पाटील या नामावलीत प्रीतम लुथरा हे वेगळे नाव माझ्या चटकन लक्षात आले.

'हजर.' एक किरकोळ मुलगा उठून उभा राहिला. किडकिडीत अंगकाठी, रया गेलेला युनिफॉर्म आणि खांदे पाडून दीनवाणे भाव चेहऱ्यावर असलेला प्रीतम मान खाली घालून हळूच माझ्याकडे बघत होता.

त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकत मी पुढचे नाव उच्चारले. त्या वर्गाला मी पहिल्यांदाच वर्गशिक्षिका म्हणून शिकवत होते. ते वेगळे नाव म्हणूनच माझ्या लक्षात राहिले. थोडे दिवस गेले अन् उमजत गेले, की प्रीतम अगदी एकलकोंडा, घुमा, अबोल, कुणाशीही न मिसळणारा असा मुलगा आहे. तो कधीही कुठल्याही उपक्रमांमध्ये भाग घेत नाही. कसाबसा काठावरती पास होतो. वर्गात शिकताना खूपदा खिडकीबाहेर रिकाम्या आकाशाच्या तुकड्याकडे टक लावून बघत राहतो.

एकदा त्याच्या निबंधात इतक्या चुका निघाल्या, की मी त्याला थांबवून घेतले अन् म्हटले, "नीट मराठीही लिहिता येत नाही तुला. तुझ्या आईवडिलांना मला ताबडतोब भेटायला सांग. तू दिवसेंदिवस आळशी होत चालला आहेस. तुझ्या पालकांना तुझा बेजबाबदारपणा कळायलाच हवा. साधे शब्द लिहिता येत नाहीत." घाबरत, अडखळत एकेक शब्द उच्चारत धीर एकवटून बोलल्यासारखा प्रीतम म्हणाला, "बाई, माझे वडील सैन्यात जवान आहेत. ते दूर सरहद्दीवर असतात. चार वर्षांपूर्वी माझी आई वारली. मग मी त्यांच्याबरोबर एक वर्ष बंगालात होतो. त्यापूर्वी मी पंजाबीत शिकलो. याच वर्षी मी इथे मामा-मामीकडे आलो. मला मराठी नीट येत नसल्याने बाकी विषयही कळत नाहीत."

कृती-२ (आकलन कृती) (२)

कोष्टक पूर्ण करा.

प्रीतमचे दर्शनी रूप	प्रीतमच्या वृत्ती

(१)


कृती-३ (स्वमत)

'माणसाचे व्यक्तिमत्त्व त्याच्या भोवतालावर अवलंबून असते'. हे विधान प्रीतम लुथरा यांच्या आधारे स्पष्ट करा. (३)

प्र. १ आ) पुढील उतारा वाचून सूचनेनुसार कृती करा.

कृती - १ (आकलन)

१) आकृती पूर्ण करा. (२)



रंगमंचावरील पडदा दूर झाला. प्रेक्षागृह एकदम शांत झालं. वाद्यवृंदाचे स्वर घुमू लागले. प्रेक्षागृहातली कुजबूज एकदम थांबली.


रंगमंचावरील प्रकाशाच्या झगमगाटात लिली हार्ले एकतानतेनं गात उभी असलेली दिसली. तेव्हा साऱ्या प्रेक्षागृहाची नजर तिच्यावर खिळून राहिली आणि वाद्यवृंदाशी जेव्हा तिच्या कंठातले स्वर एकरूप झाले तेव्हा सारे श्रोते जिवाचा कान करून ऐकू लागले. सुरेल स्वरांची एक अलौकिक तेजोमय श्रीमूर्ती साकार झाली. साऱ्या श्रोत्यांचं भान हरपून गेलं.

लिली हार्लेचा पाच वर्षांचा धाकटा मुलगा चार्ली विंगमध्ये उभा होता. आपल्या आईच्या गाण्याशी त्याची तंद्री लागली होती. तिच्याकडे मोठ्या प्रेमानं बघत तो निश्चल उभा होता.

लिली हार्लेचं गाणं ऐन रंगात आलं. तिच्या गोड गळ्यातून तारसप्तकातले स्वर सहजतेनं बाहेर पडायला लागले. तिच्या कंठमाधुर्यानं श्रोते डोलू लागले. फुलून गेले. लिली हार्लेचा तारसप्तकातला तो मधुर स्वरविलास चालला असतानाच तिचा आवाज एकदम चिरकला. काही केल्या कंठातून आवाज फुटेना. स्वर आतल्या आत विरून जाऊ लागले. स्वरांनी वाद्यवृंदाची साथसंगत सोडून दिली. काही केल्या काही होईना. बसके स्वर कंठातून बाहेर येईनात.

कृती २ (आकलन)

(२)



कृती-३ (स्वमत)

(३)


प्रेक्षागारात घडलेला तो विपरीत प्रसंग लिली कथन करीत आहे, अशी कल्पना करून लिहा.

अपठित गद्य उतारा

प्र.१ इ) पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

कृती-१ (आकलन)

(२)



१)

• आपल्या कामाची आखणी करणे, किती वेळात काम संपेल त्याचे नियोजन करणे आणि ठरवल्याप्रमाणे काम पार पाडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'वक्तशीरपणा' होय. औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांमुळे आता तर जीवन खूप गतिमान व गुंतागुंतीचे बनले आहे. त्यामुळे सध्याच्या युगात वक्तशीरपणाला पर्याय नाही. वेळेत कामे पार पाडली नाहीत, तर आपण फक्त

(२)

आपलेच नुकसान करतो असे नव्हे, तर आपल्याबरोबर आपण इतरांचेही नुकसान करतो. कल्पना करा की, बसच्या ड्रायव्हरने आळस करून एक तास उशिरा बस नेली, तर त्याच्या आळसामुळे केवळ त्याचा एक तास वाया जातो, असे नसून, त्याच्याबरोबर बसमधील पन्नास-साठ माणसांचा प्रत्येकी एक तास वाया जातो. त्या एका तासात करण्यासाठी म्हणून त्या माणसांची जी कामे ठरलेली असतात, ती एकतर रद्द होतात किंवा पुढे ढकलली जातात. या कामांवर अवलंबून असणाऱ्या इतर माणसांचेही मग नुकसान होते. म्हणून आपल्या कामांचे नियोजन करून ती वेळच्या वेळी पार पाडण्याचा कसोशीने प्रयत्न करायला हवा. हाच वक्तशीरपणा होय. वक्तशीरपणा न पाळणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणे होय.

२) कोणाचे ते लिहा. (२)

वक्तशीरपणा पाळला नाही, तर नुकसान होते.

विभाग -२ (पद्य)

प्र. २ अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

कृती-१ (आकलन)

१) पुढील कोष्टक पूर्ण करा. (२)


मानवाने करायच्या गोष्टी	मानवाने टाळायच्या गोष्टी
१)	१) .....
२)	२) .....

आपुले जगणे... आपुली ओळख! उपरे, अर्धे जोडु नको
दिवा होऊनि उजळ जगाला... चाकू घेऊन कापु नको!
नित्य घडावे वाचन, लेखन... क्षण कार्याविण दवडु नको
नित्य परवचा, व्यायामाविण झोप घ्यावया पडु नको!
पावित्र्याची पांघर वस्त्रे, होऊन पटकुर पसरु नको
शोभेहुनही श्रेष्ठ स्वच्छता, आदिमंत्र हा विसरू नको!
नम्र रहावे, सौम्य पहावे; उगा कुणास्तव अढी नको
उगा कुणाला खिजवायला करू तयावर कडी नको!
नको फुकाची 'हांजी हांजी'... लोचट, बुळचट काहि नको
परंतु दिसता उदात्त काही; ताठर माथा मुळि नको!
पेल शक्तीने गोवर्धन तू, कंस होऊनी छळू नको
नको उगाचच वाद परंतु कुणि धमकवता पळु नको!
अपुल्या अपुल्या दुःखासाठी नयनी अश्रु ठेवु नको
पण दुसऱ्यास्तव वाहो करुणा; व्यर्थ कोरडा राहु नको!
तुडवित राने खुशाल जावे, नव्या पथाला भिउ नको
ज्यावर श्रद्धा प्राणाआतुन ते केल्याविण राहु नको!
जेथे वाटा, तेथे काटा! उगा भेदरुन अडु नको
करता हिंमत, जगात किंमत! भेकड, गुळमुळ रडु नको!
कर्तृत्वाचे घडवी वेरुळ, कर्तव्याला मुकु नको
मातेसह मातिचे देणे फेडायाला चुकु नको!

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

कृती-२ **(आकलन)** **(२)**

i) आकृती पुर्ण करा.



कृती-३ **पुढील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** **(२)**

नित्य घडावे वाचन, लेखन ..... क्षण कार्याविण दवडू नको
नित्य परवचा, व्यायामविण झोप घ्यावया पडू नको!

कृती-४ **आपल्या जगण्यातून आपली ओळख व्हावी, यासाठी पाळायची पथ्ये कवितेच्या आधारे लिहा.** **(२)**

प्र. २ आ) खालील मुद्दयांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.

१) कविता - i) महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया
ii) वनवासी

कृती- १) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री - (१)

२) प्रस्तुत कवितेचा विषय - (१)

३) कवितेतून व्यक्त होणारा विचार - (२)

प्र. २ इ) पुढील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत करा. **(४)**

'धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन!'

विभाग ३ - स्थूलवाचन

प्र. ३ पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. **(६)**

१) पाठाच्या आधारे सिंहाचे कुटुंब व लेखकाचे कुटुंब यांच्या भेटीचा प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा.

२) विश्वकोशाचा उपयोग तुम्हांला मराठी भाषेतील ज्ञान प्राप्त करण्यासाठी कसा होऊ शकेल, ते लिहा.

३) 'बिग ५' चे थोडक्यात वर्णन

विभाग ४ - व्याकरण

प्र. ४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती. **(२)**

१) i) 'कंबर बांधून ऊठ घाव झेलाया' —

ii) 'हात लावून गगना, येऊ चांदण्या घेऊन वरील उदाहरणे वाचून रस ओळखा. —

२) **पुढील चरणातील मात्रांची संख्या काढून वृत्त प्रकार ओळखा.** **(२)**

घोष होता ग्यानबा तुकाराम

किंवा

आर्या वृत्ताचे लक्षण सांगून उदाहरण लिहा.

३) **पुढील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(४)**

i) काटकसर करणे

ii) कृतार्थ होणे

iii) कूस धन्य करणे

iv) प्रशंसा करणे

PTO

आ) भाषिक घटकांवर आधारित कृती

P-36

१) शब्दसंपत्ती –

अ) शब्द समुहाबद्दल एक शब्द लिहा. (१)

i) वेळेचे पालन करणारा –

ii) लिहिता – वाचता न येणारा –

ब) खालील शब्दांना विरूद्धार्थी शब्द लिहा.

i) स्वतंत्रता x ii) सावली x (१)

क) वचन बदला.

i) गाणी – ii) विमाने – (१)

ड) 'अभि' उपसर्ग असलेले दोन शब्द लिहा.

i) अभि – ii) अभि – (१)

२) लेखननियमांनुसार लेखन (२)

i) विहिर; वीहिर, विहीर, वीहीर

ii) उत्पादन, ऊत्पादन, उप्तादन, उत्पादण

iii) केंद्रित, केद्रित, केद्रीत, केंद्रीत

iv) घोंगडी, घोंगडि, घोगंडी, घोगंडि

३) खालील विरामचिन्हे ओळखून नावे लिहा.

i) • ii) ! (१)

४) पारिभाषिक शब्द (१)

पुढील पारिभाषिक शब्दांना मराठी प्रमाणभाषेत शब्द लिहा.

i) Honorable - ii) Government letter -

विभाग –५ उपयोजित लेखन

प्र. ५ अ) पुढील सूचना फलकाच्या आधारे स्व-परिचय पत्र लिहा. (६)

विकास विद्यालय, तारापूर
आंतरशालेय फूटबॉल स्पर्धा
फूटबॉल स्पर्धेतील संघात खेळाडू म्हणून प्रवेश मिळण्याबाबत

स्पर्धा
दि. २८, २९ व ३० एप्रिल

क्रीडा विभाग प्रमुख

स्व-परिचयपत्रासाठी मुद्दे	
१) संपूर्ण नाव	५) उंची – ..... सेमी वजन – .....
२) पत्ता	६) शैक्षणिक पात्रता
३) संपर्क क्रमांक	७) इतर आवडणारे खेळ
४) जन्मतारीख	८) गत वर्षी प्राप्त केलेले यश

किंवा

(५)

सारांश लेखन – पुढील उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश लिहा.

विचाराने एखादी गोष्ट समजावून दिली की ती माणसाला पटते. समजावून देण्याऐवजी भय दाखवून, मार देण्याची ती दाखवून पटवण्याचा प्रयत्न केला, तर भीती निर्माण होते; भीती न दाखवावी; तर माणूस स्वच्छंदी बनतो. सिंहाचे बळ त्याच्या दातांत आहे. हत्तीचे सामर्थ्य सोंडेत आहे. गाई-बैलांची शक्ती त्यांच्या शिंगांत आहे, तसे मानवाचे सर्वस्व कोणते – तर माणसाची शक्ती, ती त्याच्या बुद्धीत आहे. शारीरिक शक्तीला मर्यादा असते, पण बुद्धीला मर्यादा नसते. म्हणून माणूस प्राण्यांचा राजा बनला. या पृथ्वीवर राज्य करू लागला. पण याच बुद्धीमुळे माणूस अहंकारी बनला. बुद्दीचा वाईट उपयोग करू लागला. निर्बुद्धपणाने वागून तो आपले सामर्थ्य न ओळखील तर आपली शक्ती तो गमावून बसेल. माणसाच्या या बुद्धिसामर्थ्याला नीट मार्गावर ठेवण्यासाठी जो प्रयत्न केला जातो तो सत्याग्रह किंवा सत्यदर्शन!

प्र. ५ ब) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. (१०)

१) कथालेखन

प्रश्न – दिलेल्या शब्दांवरून कथालेखन करा.

दिलेले शब्द : वाघीण, पिले, बकरी, दुध, मैत्री, खेकडा, बगळा, चावा

२) (वृत्तान्त लेखन)

तुमच्या शाळेत संपन्न झालेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचा वृत्तान्त लिहा.


३) मुलाखत लेखन

स्वत:च्या घराजवळील वीजचोरी पकडणारी तुमच्या शाळेतील तनया साळवी / तनय साळी हिची याची मुलाखत घ्या.

प्र. ५ क) पुढीलपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (८)

१) कल्पना प्रधान

प्रश्न:- चौकटीतील मुद्द्यांच्या आधारे कल्पना करून निबंधलेखन करा.



किंवा

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

२) पुढील उतारा वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.

भुकणे मरूणा ये दिवस नाग्याना सहन करहताहात. पण त्यावर उपाय भेटता नाही. काम करूनी तयारी असून काम नाही. भुकने दिवस काढुला लागत. पहिला लढा नंतरने आर्थिक मंदिना ते पारतंत्र दिवस ब्रिटीसाहने सत्तेना, नाहि मार्गदर्शन, नाहि हितचिंतक ये परिस्थितीत कण्या देवधर्मनी कना उपास तपास, शाळेना तर नाव नाही. गावातल्यासाठी शाळा, गावबाल्यामाठी देवला आपण फक्त त्याहने साठी ढोराने सारखी काम करायचा भेटना ती खायचा, नायतन आर्धेच भुकवर निजी जायचाये पण दिवस जातील, चांगला दिवस येतील देवलातले मिटिंगीत आखलेले पुढाऱ्याही शब्द त्याला आठवतात. "चाला उठा जागा हया!"

१) आकृती पूर्ण करा. (१)

बोलीचे नाव - [ ]

२) सहसंबंध लक्षात घेऊन उत्तर लिहा. (१)

ब्रिटीसाहने : ब्रिटिशांच्या : : त्याहने : [ ]

३) पुढील शब्दांचा प्रमाण मराठीत अर्थ लिहा. (२)

मरूणा	भुकने	देवला	पुढाऱ्याही
[ ]	[ ]	[ ]	[ ]

४) वरील उताऱ्याचा प्रमाण मराठीत अनुवाद करा. (४)

***

https://www.pyqonline.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10₹ to 40₹
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये से 40 रुपये तक पायें,
Paytm or Google Pay से